25 JUN 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शाहू सलोखा मंचतर्फे विविध समाजातील ८० व्यक्तींचा सत्कार

# शाहू विचार परिषद देशव्यापी नव्हे आंतरराष्ट्रीय : डॉ. डी. टी. शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराज यांचा समतेचा विचार परिषदेच्या माध्यमातून जगभर पोहोचल्याचा अभिमान आहे. संशोधक, अभ्यासक, मान्यवरांनी देश-विदेशातून शुभेच्छा पाठवल्याने ही देशव्यापी नसून आंतरराष्ट्रीय परिषद ठरली, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी केले.

राजर्षी शाहू छत्रपती शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त शाहू सलोखा मंच, राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी समितीतर्फे येथील शाहू स्मारक भवनात ही परिषद झाली. वसंतराव मुळीक म्हणाले, राज्य सरकार संगीत विद्यालय उभारण्यासाठी ४०० कोटी देऊ शकते मग शाहू जन्मस्थळासाठी १५० कोटी का देऊ शकत नाही? धारवाड येथील मराठा मंडळासाठी राजर्षींची प्रतिमा, कानपुरात शाहू विचारांचे प्रदर्शन भरवण्यासाठी छायाचित्रे, कागदपत्रे देण्याचे इंद्रजित सावंत यांनी जाहीर केले. बबन रानगे, स्वप्निल पन्हाळकर, संजय कांबळे, गणी आजरेकर, कादर मलबारी, सुभाष जाधव, संजय शेटे, अशोक भंडारे, दगडू भास्कर, शैलजा भोसले, चंद्रकांत चव्हाण, शाहीर दिलीप सावंत उपस्थित होते.



कोल्हापुरात शाहू स्मारक भवनात सोमवारी देशव्यापी शाहू विचार परिषदेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी इंद्रजित सावंत, वसंतराव मुळीक, बबन रानगे उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

## धारवाड, कानपूर, लातूरहून शाहूप्रेमींची उपस्थिती

राजर्षींनी जिथे शिक्षण घेतले ते धारवाड, छत्रपती शाहू महाराजांना राजर्षी पदवी देणारे कानपूरच्या कुर्मी समाजाचे प्रतिनिधी तसेच लातूर येथील शाहूप्रेमी या परिषदेस उपस्थित होते. हिंदी भाषेतील विविध ग्रंथसंपदा कोल्हापूरकरांना त्यांनी भेट दिली. या ठिकाणाहून परिषदेसाठी आलेल्या पुरुष, महिला तसेच लहान मुलांचा कोल्हापुरी फेटा आणि शाल देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

## इटलीहून शुभेच्छा

परिषदेला इटली येथील इतिहासाच्या अभ्यासक सादा कन्सुरा यांनी व्हिडीओद्वारे शुभेच्छा दिल्या. शाहूंचे क्रांतीकार्य राष्ट्रीय गौरवाचे असल्याचे त्या म्हणाल्या. कवी सुल्तानपुरी यांनी तयार केलेल्या शाहू चालिसाचे यावेळी सादरीकरण केले.

## ८० जणांचा सन्मान

सुरेश शिपूरकर, व्यंकाप्पा भोसले, सुंदरराव देसाई, दिलीप पवार, किसन कुऱ्हाडे, बी. ए. पाटील यांच्यासह ८० शाहूप्रेमी समाजप्रतिनिधी, मंजूनाथ कदम, विजय भोसले, नवीन कदम, प्रदीप कटीयार, संजय कटियार, ॲड. शशिकांत सच्चान यांचा सत्कार केला.

# समतेचा विचार जगभर पोहोचवा

## डॉ. डी. टी. शिर्के : शाहू सलोखा मंचतर्फे देशव्यापी शाहू विचार परिषद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २४ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा समतेचा विचार जगभर पोहोचणे हेच शाहू विचार परिषदेचे फलित आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

शाहू सलोखा मंचतर्फे आयोजित देशव्यापी शाहू विचार परिषदेत ते बोलत होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्षानिमित्त तिचे आयोजन केले होते. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनमध्ये परिषद झाली.

डॉ. शिर्के म्हणाले, 'केवळ देशातून नव्हे तर परदेशातून परिषदेसाठी संदेश पाठविण्यात आले आहेत. याचा अर्थ परिषदेचा मूळ हेतू सफल झाला आहे.'

मंचचे निमंत्रक वसंतराव मुळीक म्हणाले, 'पुरोगामी विचारांचा एकोपा तोडण्याचे षड्यंत्र आखले जात आहे. त्याला सर्व जातीधर्मातील लोक सडेतोड उत्तर देतील, यात शंका नाही. शासन संगीत विद्यालयासाठी चारशे कोटी रुपये देत असेल, तर शाहू जन्म स्थळासाठी १५० कोटी रुपये देण्यासाठी ते हात आखडते का घेत आहे?''

इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत म्हणाले, 'शाहूप्रेमींना आंदोलन केल्याशिवाय मिळत नाही. शाहू जन्मस्थळाचा विकास रखडला आहे. ते पूर्ण करण्यासाठी शाहूप्रेमीच पुढाकार घेतील.'

यावेळी शाहूंच्या पुरोगामी विचारांचे कार्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, शाहूप्रेमी ८० समाज प्रतिनिधी, कानपूर, धारवाड, लातूरमधील प्रतिनिधींचा विशेष सन्मान केला. यात धारवाडचे मंजूनाथ कदम,



कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त आयोजित शाहू विचार परिषदेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी वसंतराव मुळीक, बबन रानगे, इंद्रजित सावंत, बाळासाहेब भोसले आदी.

विजय भोसले, नवीन कदम, कानपूरचे प्रदीप कटियार, संजय कटियार, ॲड. शशिकांत सच्चान, सुरेश शिपूरकर, व्यंकाप्पा भोसले, सुंदर देसाई, दिलीप पवार, किसनराव कुऱ्हाडे, बी. ए. पाटील यांचा समावेश होता. मंचचे सहनिमंत्रक बबनराव रानगे यांनी स्वागत केले. स्वप्नील पन्हाळकर यांनी सूत्रसंचालन केले. संजय कांबळे यांनी आभार मानले.

### कोल्हापुरी फेटा देऊन सन्मान

कानपूरमधील कुर्मी समाजाने शाहू राजांना 'राजर्षी' पदवी दिली. शाहूंचे शिक्षण धारवाड येथे झाले. या दोन्ही शहरांसह लातूर येथील शाहूप्रेमींनी परिषदेस हजेरी लावून तेथे शाहू विचार रुजविण्याचे काम कसे सुरू आहे, याची माहिती दिली. त्यांनी हिंदी भाषेतील विविध प्रकाशने भेट दिल्यानंतर, त्यांचा कोल्हापुरी फेटा, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

### इटलीतून शुभेच्छा

इटलीतील अभ्यासक साव्रा कन्सुराही यांनी ऑनलाईन शुभेच्छा संदेश दिला. यावेळी कवी सुल्तानपुरी यांनी तयार केलेल्या शाहू चालिसाचे सादरीकरण झाले, तर आखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभा कानपूरच्या विशेष कॅलेंडरचे प्रकाशन करण्यात आले.

# शाहू विचार जगभर पोहोचल्याचा अभिमान

## कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के : शाहू सलोखा मंचची देशव्यापी विचार परिषद उत्साहात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीनिमीत्त शाहू सलोखा मंच आयोजित देशव्यापी शाहू विचार परिषदेच्या माध्यमातून त्यांचा समतेचा विचार जगभर पोहोचल्याचा अभिमान आहे. या परिषदेसाठी . संशोधक-अभ्यासक-मान्यवर देश-विदेशातून शुभेच्छा संदेश पाठवत असल्याने ही परिषद देशव्यापी नसून आंतरराष्ट्रीय म्हणावी लागेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शाहू सलोखा मंचतर्फे आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या अंतर्गत सोमवारी राजर्षी शाहू स्मारक भवन येथे देशव्यापी शाहू विचार परिषद झाली. यात मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ: शिर्के म्हणाले, राजर्षी शाहू संशोधन केंद्रातर्फे शाहू विचार प्रचार व प्रसाराचे अखंड कार्य सुरूच आहे. राजर्षीच्या १५० व्या जयंतीनिमीत्त शिवाजी विद्यापीठातर्फे वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

यात आंतरराष्ट्रीय शाहू विचार परिषद, राजर्षी शाहू ऑनलाईन मराठी-हिंदी-इंग्रजी भाषेतील अभ्यासक्रम आणि कुस्ती संकुलाचा प्रारंभ अशा उपक्रमांचा समावेश असणार आहे. याची सुरुवात शाहू जयंतीदिवशी (दि. २६ जून) कुस्ती संकुलाच्या उद्घाटनाने होईल. हिंदकेसरी दिनानाथसिंह यांच्या हस्ते हा सोहळा होईल.



कोल्हापूर : राजर्षी शाहू छत्रपती शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीनिमित्त शाहू सलोखा मंचतर्फे आयोजित देशव्यापी शाहू विचार परिषदेत ८० समाज प्रतिनिधी, कानपूर-धारवाड व लातूर येथील शाहूप्रेमींचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, निमंत्रक वसंतराव मुळीक, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, बबनराव रानगे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

**धारवाड, कानपूर, लातूरहून शाहूप्रेमी उपस्थित**

राजर्षी शाहूंनी शिक्षण घेतलेले धारवाड शहर, छत्रपती शाहू महाराजांना राजर्षी पदवी देणारे कानपूरच्या कुरमी समाजाचे प्रतिनिधी आणि लातूर येथील शाहूप्रेमींनी परिषदेस उपस्थिती लावली होती. त्यांनी आपल्या गावांत सुरू असणाऱ्या शाहू विचार कार्याची माहिती दिली. त्यांनी निर्माण केलेली हिंदी भाषेतील विविध प्रकाशने कोल्हापूरकरांना भेट दिली. कोल्हापूरकरांनीही त्यांचील पुरुष-महिला व बालचमूंचा विशेष सन्मान कोल्हापुरी फेटा-शाळा-श्रीफळ देऊन केला.

**पुरोगामी विचारांचा एकोपा तोडण्याचे षड्यंत्र : मुळीक**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा जपणाऱ्या कोल्हापुरात सर्व जाती-धर्मीय लोक एकोप्याने राहतात. हा एकोपा तोडण्याचे षड्यंत्र गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. हे षड्यंत्र हाणून पाडण्याचे आवाहन मंचचे निमंत्रक वसंतराव मुळीक यांनी प्रास्ताविकात केले. राज्य सरकारकडून संगीत विद्यालय उभारण्यासाठी ४०० कोटी देऊ शकते, मग राजर्षी शाहू जन्मस्थळासाठी १५० कोटी का देऊ शकत नाही? असा सवाल त्यांनी व्यक्त केला.

**शाहू स्मारकांसाठी झगडावे लागणे दुर्दैवी : सावंत**

शाहूनगरीत शाहू समारकांसाठी झगडावे लागणे हे सर्वात मोठे दुर्दैव असल्याची खंत इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी व्यक्त केली. शाहू जन्मस्थळाचा विकास २००७ पासून रखडला आहे. राज्य शासन अनावश्यक गोष्टींना कोट्यवधी रुपये निधी देते; मात्र राजर्षी शाहूंच्या स्मारकांसाठी शाहूप्रेमींना रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागत आहे. यामुळे आता शासनाच्या कार्यवाहीची वाट न पाहता राजर्षी शाहूंच्या १५० व्या जयंती वर्षात आपण शाहूप्रेमींनी शाहू जन्मस्थळाचे काम यथाशक्ती पूर्ण करूया, असे आवाहन सावंत यांनी केले. उपस्थितांनी हात उंचावत राजर्षी शाहूंचा जयघोष करत त्यांना पाठिंबा जाहीर केला, तसेच राजर्षी शाहूंचे शिक्षण झालेल्या धारवाड येथील मराठा मंडळात राजर्षी शाहूंचा पुतळा उभारण्याची आणि कानपुरात शाहू विचारांचे प्रदर्शन उभारण्याचे आवाहन सावंत यांनी यानिमित्ताने केले.

**पुरोगामी कार्यकर्त्यांसह ८० समाजांचा सन्मान**

राजर्षी शाहूंच्या पुरोगामी विचारांचे कार्य करणाऱ्या ज्येष्ठांसह शाहूप्रेमी ८० समाजप्रतिनिधी आणि कानपूर, धारवाड, लातूर येथून विशेष आमंत्रीत प्रतिनिधींचा विशेष सन्मान कुलगुरुंच्या हस्ते करण्यात आला. यात सुरेश शिपुरकर, व्यंकाप्पा भोसले, सुंदरराव देसाई, कॉम्रेड दिलीप पवार, किसनराव कुऱ्हाडे, बी. ए. पाटील, धारवाडचे मंजूनाथ कदम, विजय भोसले, नवीन कदम, कानपूरचे प्रदीप कटीयार, संजय कटियार, ॲड. शशिकांत सच्चान आदी मान्यवरांचा समावेश होता. सहनिमंत्रक बबनराव रानगे यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन स्वप्नील पन्हाळकर तर आभार प्रदर्शन संजय कांबळे यांनी केले. यावेळी गणी आजरेकर, कादर मलबारी, सुभाष जाधव, संजय शेटे, अशोक भंडारे, दगडू भास्कर, शैलजा भोसले, चंद्रकांत चव्हाण, शाहीर दिलीप सावंत, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### परदेशातून शुभसंदेश अन् शाहू चालीसा

परिषदेसाठी उपस्थित न राहिल्याने इटली येथील अभ्यासक साद्रा कन्सुराही यांनी ऑनलाईन शुभेच्छा संदेश दिला. राजर्षी शाहूंचे क्रांती कार्य राष्ट्रीय गौरवाचे असल्याचे त्यांनी सांगितले. कवी सुल्तानपुरी यांनी तयार केलेल्या शाहू चालीसाचे यावेळी सादरीकरण करण्यात आले. अखिल भारतीय कुर्मी क्षत्रीय महासभा कानपूरच्या विशेष कॅलेंडरचे प्रकाशनही करण्यात आले. कानपूर येथील ६ वर्षीय राजरतन सच्चान यांनी शिवछत्रपती व राजर्षी शाहू यांच्याविषयी गीत गायन करून उपस्थितांची मने जिंकली.

25 JUN 2024

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहूंचे विचार आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणार

## देशव्यापी शाहू विचार परिषदेमध्ये कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

इटलीमधील शुभसंदेश व येत्या दोन महिन्यांत शिवाजी विद्यापिठामार्फत राजर्षी शाहू महाराज यांच्यावरील कोर्स ऑनलाईनव्दारे सुरू होणार आहे. यामुळे राजर्षी शाहू महाराज यांचे विचार आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणार आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

राजर्षी शाहू छत्रपती शतकोतर सुवर्ण महोत्सव जयंती निमित सोमवारी शाहू स्मारक भवनमध्ये आयोजित देशव्यापी शाहू विचार परिषदेचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राजर्षी शाहू सलोखा मंच व राजर्षी शाहू स्मृती शताब्दी समितीच्यावतीने याचे आयोजन केले होते. यावेळी लातूर, कानपूर येथील अखिल भारतीय कुरमी क्षेत्रिय महासभा, धारवाड येथील शिक्षण संस्थेच्या मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांचा सत्कार केला.

यावेळी कुलगुरू म्हणाले, ही परिषद देशव्यापी नसून आंतरराष्ट्रीय ठरली आहे. अशा परिषदा शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू करण्याचा मानस आहे. शाहूंनी विविध क्षेत्रामध्ये केलेल्या कार्याचा ठसा सर्वत्र उमटवला आहे. यामुळे ते माणसातील राजा झाले आहेत. शाहूंच्या शतकोतर वर्षानिमित विद्यापीठातर्फे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. २६ रोजी विद्यापीठाच्या दीड कोटींच्या कुस्ती संकुलाचे उद्घाटन होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : शाहू स्मारक भवनमध्ये शाहू विचार परिषदेमध्ये बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत विजय भोसले, मंजुनाथ कदम, इंद्रजित सावंत, वसंतराव मुळीक, बबन रानगे, प्रदीप कटियार, पावेंद्र कटियार, बाळासाहेब भोसले आदी.

कानपूर येथील अखिल भारतीय कुरमी क्षेत्रिय महासभेने राजेंना राजर्षी हा बहुमान दिला आहे. या संघटनेचे प्रमुख प्रतिनिधी कुटुंबियासह तर धारवाड येथे राजेंनी शिक्षण घेतलेल्या शाळेच्या पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावली होती. इटली येथील शुभसंदेश, कवी सुल्तानपरी चालीसा यावेळी टीव्हीवर दाखवण्यात आली.

कानपूरचे महासंघाचे अध्यक्ष ॲड. पावेंद्र कटरिया म्हणाले, सर्व धर्मांना आपल्या सोबत नेणारे राजर्षी शाहू महाराज यांची देशाच्या इतिहासामध्ये नोंद झाली आहे. धारवाडचे विजय भोसले यांनी व्हिक्टोरिया हायस्कूलमध्ये शिक्षण घेतलेल्या राजेंनी सर्व जातींसाठी धारवाडमध्ये शिक्षण संस्था उभारल्याचे सांगितले. उपाध्यक्ष प्रदीप कटरिया यांचेही भाषण झाले.

इतिहास संशोधक इंद्रजित सावंत म्हणाले, गेल्या १५० वर्षात राजर्षी शाहू यांना देशभरात सन्मान मिळत आहे. तर निमंत्रक वसंत मुळीक यांनी शाहूंच्या कोल्हापुरात सामाजिक सलोखा कायम रहावा, असे सांगितले.

स्वागत सहनिमंत्रक बबन रानगे, आभार संजय कांबळे यांनी मानले. यावेळी ८० समाजातील प्रतिनिधींचा व सुरेश शिपूरकर, व्यंकाप्पा भोसले, कॉ. दिलीप पवार, किसन कुऱ्हाडे, सुंदर देसाई यांचा सत्कार केला.

यावेळी कानपूरचे सुजित सचान, महिला विभागाच्या प्रीती कटीयर, माया कटीयर, ममता सचान, सुनिता कटीयर, प्रेमलता कटीयर, रश्मी सचान, अंजली पटेल, धारवाडचे मंजुनाथ कदम, लातूरचे वैभव सरोदे व संजय शेटे, सुरेश रोटे, अशोक मंडारे, आनंद म्हाळुंगेकर, अवधूत पाटील, शशिकांत पाटील, शाहीर दिलीप सावंत, दगडू भास्कर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

25 JUN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवं धोरण, विद्यार्थ्यांना देणार बहुशाखीय शिक्षण

## शिवाजी विद्यापीठात अंमलबजावणी ; एकाचवेळी विविध विषयांचा अभ्यास करता येणार

### बदलते उच्च शिक्षण : भाग-१

**बदलत्या काळानुसार आणि नव्या युगातील आव्हानांचा सामना करणारे विद्यार्थी घडविण्यासाठी देशभरातील विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांनी नवे शैक्षणिक धोरण स्वीकारले आहे. त्यात दक्षिण महाराष्ट्राची ज्ञानगंगा असलेल्या शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये विद्यापीठ अग्रभागी आहे. या धोरणानुसार विद्यापीठ, महाविद्यालय पातळीवर यावर्षीपासून होणारे बदल, नवे अभ्यासक्रम, पदवीचे स्वरूप आदींचा आढावा घेणारी मालिका आजपासून...**

■ **संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २४ : बहुशाखीय शिक्षण, पदवी अभ्यासक्रम आणि त्याच्या निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना या नव्या शैक्षणिक धोरणामुळे मिळणार आहे. त्यांनी पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यानंतर एकाचवेळी विविध विषय, अभ्यासक्रमांचे शिक्षण त्यांना घेता येणार आहे. या स्वरुपातील शिक्षणामुळे त्यांचा वेगळ्या पद्धतीने विचार करण्याचा दृष्टिकोन व्यापक होणार आहे.

बहुशाखीय शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य-व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान, संगीत, क्रीडा आदी विद्याशाखांतील विषय एकाचवेळी निवडता येणार आहे. त्यांना चांगल्या पद्धतीने करिअर घडविण्यास मदत होणार आहे.

### मुख्य, उपविषय निवडावे लागणार

बहुशाखीय शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना मुख्य आणि उपविषय निवडावे लागणार आहे. त्यांना पदवीच्या प्रथम वर्षात बहुशाखीय विषयांचा अभ्यासक्रम जाणून घेण्यासाठी मार्गदर्शन आणि वेळ मिळणार आहे. एक-दोन विषयांची निवड बदलायची झाली, तर त्याची व्यवस्था नव्या धोरणात विद्यापीठाने केली आहे.

“ यावर्षीपासून विद्यापीठ कॅम्पसवरील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील पदवीस्तरीय अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू केले जाणार आहे. त्याबाबत अभ्यासक्रम निश्चिती, विद्यापीठाच्या विविध घटकांची कार्यशाळा आदी स्वरुपातील त्याची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. अंमलबजावणीनंतर धोरणाचे बारकाईने मूल्यमापन केले जाणार आहे. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, संस्था चालकांशी संवाद साधला जाणार आहे. त्यांची मते जाणून घेऊन त्यावर विचार केला जाईल. या धोरणाच्या अंमलबजावणीचे आव्हान विद्यापीठ ते निश्चितपणे पेलेल.

**- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू



### बहुशाखीय शिक्षणाने काय होणार ?

- **विद्यार्थ्यांमध्ये विचार कौशल्य विकासाला बळ मिळणार**
- **अभ्यास करण्यासह ज्ञानाच्या नव्या मार्गावर चालता येणार**
- **करिअर घडविण्यासाठी आवश्यक विषय निवडता येणार**

### पदव्युत्तर विभागात चांगले परिणाम

**■ शिवाजी विद्यापीठाने कॅम्पसवरील पदव्युत्तर विभागांमध्ये गेल्यावर्षी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली. रोजगारभिमुखता वाढविणे या धोरणाचा उद्देश आहे. त्यानुसार बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय, कौशल्यपूर्ण शिक्षण दिले जाणार आहे. या पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंगला महाराष्ट्रभर संधी मिळाली. त्यांचा अनुभव चांगला आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीचे चांगले परिणाम दिसल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.**

### दृष्टिक्षेपात

| | |
|---|---|
| ■ विद्यापीठ कॅम्पसवरील अधिविभाग | ३४ |
| ■ संलग्नित महाविद्यालयांची संख्या | २७६ |
| ■ एकूण विद्यार्थी संख्या | २ लाख ४४ हजार ४४१ |
| ■ मुलांची संख्या | १ लाख २८ हजार ८६३ |
| ■ मुलींची संख्या | १ लाख १५ हजार ५७३ |